|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

संलग्नता विभाग

जाक्र.कबचौउमवि/५/३३०/२०२५.                                                                                    दि. ०१/१२/२०२५.

**परिपत्रक (अत्यंत महत्त्वाचे)**

**(संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता)**

**अंतिम स्मरणपत्र**

**प्रति,**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या**

**सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. संचालक यांना...**

**विषय** :- OAASIS प्रणालीद्वारे महाविद्यालयाची माहिती तात्काळ अद्ययावत करणेबाबत..

**संदर्भ** :- ०१) जा.क्र.कबचौउमवि/५/३००/२०२५ दि. ०७/१०/२०२५

०२) जाक्र.कबचौउमवि/५/३१९/२०२५ दि. ०६/११/२०२५.

**महोदय/महोदया**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संलग्नता विभागाचे कामकाज ऑनलाईन प्रणालीमार्फत सुरू आहे. संबंधित महाविद्यालये/परिसंस्था संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव सादर करताना Academic Information आणि Teachers Information update करून प्रस्ताव भरून विद्यापीठास ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करतात हे आपणास विदित आहे. करीता संदर्भ पत्र क्र. १ अन्वये विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था यांना माहिती अद्ययावत करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्यापपर्यंत बऱ्याच महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी संदर्भीय पत्र क्र १ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती अद्ययावत केलेली नाही. त्यामुळे संबंधित महाविद्यालये व परिसंस्था यांच्याबाबत ऑनलाईन प्रणालीव्दारे कामकाज करतांना विद्यापीठ कार्यालयास अडचणी येत आहेत.

तरी उपरोक्त संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अद्याप आपल्या महाविद्यालयाची/परिसंस्थेची माहिती अद्ययावत केलेली नसेल त्यांनी दि. १५ डिसेंबर २०२५ पर्यंत माहिती अद्ययावत करावी. दि. १५ डिसेंबर २०२५ नंतर माहिती अद्ययावत करणेसाठीच्या सर्व Link बंद करण्यात येतील व विद्यापीठाकडे उपलब्ध असलेली माहिती Lock करण्यात येईल. त्यानंतर कुटल्याही सबबीवर माहिती अद्ययावत करण्यासाठी Link Unlock करुन दिली जाणार नाही याची गांभीर्याने नोंद घेवून सदरची माहिती संदर्भिय परिपत्रक क्र. १ व २ विचारात घेवून अद्ययावत (Update) करणे संदर्भात आपले स्तरावर तात्काळ कार्यवाही व्हावी, ही विनंती.

कळावे.

**आपली विश्वासू**

(सविता पी. सोनकांबळे)

**उपकुलसचिव(संलग्नता विभाग)**